**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय , मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक - ५ ऑगस्ट २००८**

# नोटीस

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४
क्रमांक -एमआरडी-३३०८/४११/प्र.क्र.३५/नवि-७ - सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येते की, “मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३२च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने, मुंबई उपनगर जिल्हयात मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्याच्या रुंदीकरणाच्या प्रयोजनासाठी, काही जमिनी व त्यावरील बांधकामे संपादित करण्यासाठी एक अधिसूचना काढण्याचे योजिले आहे. त्या अधिसूचनेचा मसुदा यासोबत जोडला आहे.

२. उक्त अधिसूचनेसंबंधात कोणतीही हरकत घेणा-या कोणत्याही व्यक्तीस, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या कालावधीच्या आत, प्रधान सचिव (१) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे त्याबाबत लेखी कारण दर्शविण्यास याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

३. उक्त कालावधीत प्राप्त होणा-या अशा कोणत्याही हरकती शासन विचारात घेईल.

## अधिसूचनेचा मसूदा

क्रमांक ———————————— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे (एम.यु.टी.पी.) काम पार पाडण्यासाठी शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक - एमयुटीपी/२००२/१४०७/सीआर-१८२/०२/नवि-७, दिनांक १९ फेब्रुवारी, २००२ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मध्यस्थ अभिकरण (Nodal Agency) म्हणून नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मध्यस्थ अभिकरणाने, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एम.यु.टी.पी.) यासाठी काही जमिनी व त्यावरील बांधकामे संपादित करण्याची राज्य शासनाला विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त मध्यस्थ अभिकरणाने, हाती घेतलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत (एम.यु.टी.पी. अंतर्गत) जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्याच्या रुंदीकरणाच्या प्रयोजनासाठी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या काही जमिनी, त्यावरील बांधकामासह संपादित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ च्या महा.४) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३२च्या पोटकलम (१) च्या परंतुकान्वये आवश्यक असलेली नोटीस, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, दि. ०५ ऑगस्ट, २००८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे, आणि तसेच, उक्त नोटीस, उक्त जमिनीच्या मालकांवर आणि त्यात हितसंबंधित असलेल्या इतर व्यक्तींवरदेखील बजावण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, उक्त नोटिसीनुसार प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी त्यांवरील बांधकामांसह संपादित करण्याचे प्रस्तावित केले आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३२ची पोटकलमे (१) आणि (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी, त्यांवरील बांधकामांसह संपादित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

## अनुसूची

| **गावाचे किंवा प्रभागाचे नाव** (१) | **भूमापन क्रमांक** (२) | **नगर भूमापन क्रमांक** (३) | **एकुण क्षेत्र (चौ.मी.मध्ये)** (४) | **संपादित करावयाचे प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी.मध्ये)** (५) |
|---|---|---|---|---|
| मौजे तिरंदाज ता.कुर्ला जिल्हा मुंबई उपनगर | ६/१ (भाग) आणि ९/१ | १३/१२ ते १३/२१ | ४३० | ४३०.०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुरेश काकानी)**
**शासनाचे उप सचिव**

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th August 2008

**Notice**

MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY ACT, 1974.

No. MRD. 3308/411/C.R. 35/UD-7.—It is Brought to the Notice of all concerned that, the Government of Maharshtra, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 32 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975), proposes to issue a notification, for acquisition of certain lands and structures appurtenant thereto for the purpose of widening of the Jogeshwari-Vikhroli Link Road under Mumbai Urban Transport Project (MUTP) in Mumbai Suburban District, the draft of which is appended herewith.

2. Any person who entertains any objection to the said notification, is hereby called upon to show cause, in writing, to the Principal Secretary (1) to Government, Urban Development Department, Mantralaya, Mumbai 400 032, within a period of one months, from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette*.

3. Any such objection which may be received during the said period will be considered by Government.

***DRAFT NOTIFICATION***

No. Whereas , the Government of Maharashtra has, vide Government Resolution, Urban Development Department, Mo.MUTP.2002/1407/C.R. 182/02/UD-7, dated the 19th February 2002, appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority as a Nodal Agency to carry out the work of the Mumbai Urban Transport Project (MUTP)

And whereas, the said Nodal Agency has requested the State Government for certain lands and structures appurtenant thereto for the Mumbai Urban Transport Project (MUTP);

And whereas, for the purpose of widening of Jogeshwari-Vikhroli Link Road under the Mumbai Urban Transport Project (MUTP) undertaken by the said Nodal Agency, it has become necessary to acquire certain lands, specified in Schedule appended hereto, alongwith structures appurtenant thereto;

And whereas, the Notice as required under the proviso to sub-section(1) of section 32 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah.IV of 1975) (hereinafter referred to as the said Act) has been published in the Maharashtra Government Gazette, on the 5th August, 2008 and the said Notice was also served on the owner and other persons interested in the said land;

And whereas, after considering the objections received pursuant to the said notice, the Government of Maharashtra proposes to acquire the land specified in the Schedule appended hereto, alongwith the structures appurtenant thereto ;

Now, Therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) and sub-section(2) of sections 32 of the said Act, the Government of Maharashtra hereby acquires, the lands specified in the Schedule appended herewith alongwith the structures appurtenant thereto.

***Schedule***

| Name of Village or Ward | Survey No | C.T.S. No. | Total Area (in Sq. mtrs.) | Area proposed to be acquired (in Sq. mtrs.) |
|---|---|---|---|---|
| **(1)** | **(2)** | **(3)** | **(4)** | **(5)** |
| Village Tirandaj Taluka –Kurla, District Mumbai Suburban. | 6/1 (P) and 9/1 | 13/12 to 13/21 | 430.00 | 430.00 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURESH KAKANI,
Deputy Secretary to Government,